**<u>वादीतर्फे श्री.व्ही.एस.शेळके वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.</u>**

**१७.** पोलीस उपनिरीक्षक बंकवाडी यांनी दि.२८/०३/२०२२ रोजी मी केलेल्या तक्रारीची सर्व माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी यांना पाठविली आहे याची मला माहिती नाही. हे खरे की, पोलीस, महसूल व पंचायत समिती यांचे कर्मचारी व अधिकारी माझ्या तक्रारीची दखल घेत नाहीत म्हणून मी त्यांच्याविरुध्द वरिष्ठांकडे दाद मागितली आहे. वादी क्रं. २ ने दि.२३/११/२०२१ रोजी मी व प्र.वादी क्रं. १ यांच्याविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करावी म्हणून अर्ज केल्याचे मला माहिती नाही. हे खरे की, आमच्याविरुध्द ३०-३२ लोकांनी हम्मला केला म्हणून मी तक्रार केली होती. हे खरे की, ती तक्रार मी सर्व पोलीस अधिका-यांकडे केली होती. तक्रार घडली नाही असे निष्पन्न झाल्याचा अहवाल पोलीसांनी दिला हे मला माहिती नाही. हे खरे की, यामध्ये ॲड. विजय शेळके यांच्यासह उजना गावातील प्रतिष्ठीत नागरीक यांच्यासह डॉक्टरांचा सुध्दा समावेश होता. हे खरे नाही की, वादीचे विधीज्ञ, तंटामुक्ती अध्यक्ष, व सकारात्मक काम करणा-या व्यक्तीविरुध्द ती तक्रार होती. हे खरे की, त्या तक्रारीत सामुहीक बलात्कार केला म्हणून ७ महिला व ३ बालकांचाही समावेश आहे. त्या ७ महिलांचे पती अन्य आरोपी होते याबद्दल मला माहिती नाही.

**१८.** मला उजना येथे राहणारी भामाबाई माझी बहीण नाही. तिचे नाव भिमाबाई होते. ती कधी मयत झाली हे मला आठवत नाही. हे खरे की, तिचा ५० लोकांनी विष पाजून खून केला असे माझे म्हणणे होते.

**१९.** माझे आई-वडील यांनी त्यांचा हिस्सा वादी क्रं. २ यांना विकला त्या खरेदीपत्रातील मजकूर मी वाचलेला आहे. माझ्या वडीलांनी लक्ष्मण कासले यांना त्यांचे राहते घर विकले या खरेदीपत्रातील मजकूर मी वाचलेला नाही. हे खरे की, राणीसावरगावातील मिळकत कोणी कोणाला विकली त्याचा दस्त

याकामी दाखल नाही. मी व प्रतिवादी क्रं.१ ने उजना गावातील १०० लोकांविरुध्द कमीत कमी १०० तक्रारी दिलेल्या आहेत याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, त्या तक्रारी कायदेशीर नसल्याने कोणाविरुध्दही गुन्हा दाखल झाला नाही. या दाव्याशिवाय माझ्या विरुध्द अहमदपूर न्यायालयात आणखी एक खटला चालू आहे. गंगाखेड न्यायालयात प्रतिवादीविरुध्द कोणताही दावा, खटला नाही. हे खरे नाही की, १९९० ते २०२२ पर्यंत मी दाखल केलेल्या प्रत्येक तक्रारीत माझा पत्ता राणीसावरगाव असा नमूद केलेला आहे. दावामिळकत सोडून त्यातील उर्वरीत मिळकत माझ्याहिस्साची होती असे प्रकारचा दावा माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीत केला नव्हता हे म्हणणे बरोबर आहे. दावामिळकतीपैकी ९९७.९८ चौ.फुट क्षेत्रफळ असलेली मिळकत माझ्या वडीलांच्या हिस्स्याला वाटून आली असे दाखविणारा दस्त याकामी दाखल नाही हे खरे नाही. हे खरे नाही की, माझ्या आईवडीलांच्या नावे त्यांच्या हयातीपर्यंत व त्यानंतर कोणतेही घरजागा नव्हती व नाही. हे खरे नाही की, असा कोणताही दस्ताऐवज जमीनीबद्दलचा याकामी दाखल नाही. प्रतिवादी क्रं.१ च्या नावे घर वर्ग केल्याचा दस्ताऐवज आज रोजी किंवा यापूर्वी दाखल केला आहे. असा कोणताही एकही कागद याकामी दाखल नाही हे खरे नाही. प्र.वादी क्रं. १ च्या नावे घराची नोंद झाल्याबद्दल कोणताही दस्त नाही, हे खरे नाही. सन २०१२-२०१३ सालानंतर वडीलांच्या मृत्यूनंतर वादमिळकत वादी क्रं.२ व मी यांच्या नावे लागली हे खरे नाही.

**२०.** हे खरे की, वादघर हे माळवदाचे व लादनीचे होते. हे खरे नाही की, सदरचे घर मी व प्र.वादी क्रं.२ दोघांचे स्वतंत्र हिस्से करुन बांधून घेतले. या घराच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे दोन स्वतंत्र शौचालय व न्हाणीघर आहे हे खरे आहे. या घराच्या पश्चीमेचा भाग पूर्णत: स्लॅबचा आहे हे खरे आहे. या घराच्या पश्चीमेच्या पहिल्या व दुस-या भागालगत पूर्व पश्चीम चालीने भिंत आहे हे खरे नाही. या घराचा तिसरा भाग खुला आहे हे खरे नाही. हे खरे की, वादघराचे मुख्य प्रवेशद्वार हे दक्षिणेला आहे. दक्षिण द्वारातून आत आल्यावर पश्चीमेला घरात जाण्यासाठी दरवाजा आहे हे खरे नाही. या संपूर्ण घराच्या पूर्व,पश्चीम व दक्षिण

बाजूला भिंत आहे हे खरे नाही. हे खरे की, दक्षीणेच्या प्रवेशद्वारातून आत आल्यावर पश्चीमेला वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पाय-या आहेत.आजही या घराच्या पश्चीम भागावर लादनी आहे हे खरे आहे. हे खरे की, या घराच्या उत्तर बाजूला दोन खोल्या बांधलेल्या आहेत. हे खरे की, दक्षिणेच्या द्वारातून आत आल्यांनतर पश्चीम बाजूला घरात  जाण्यापूर्वी एक चॅनेलगेट आहे. हे खरे नाही की, चॅनेलगेटला समांतर उत्तरेला पुर्व मुखी दरवाजा आहे. हे खरे नाही की, वाद घराच्या दक्षीण बाजूला असलेल्या भागापासून पश्चमीकडील बाजूला घर, लादनी, पाय-या, शौचालय याचा वादी मालक आहे. हे खरे की, उत्तरेकडे दरवाजापासून उत्तरेकडच्या दोन खोल्या, शौचालय, लादनी याचा वापर मी करतो.

**वकीलांच्या प्रकृती अस्वस्थामुळे प्रकरण पुढे ठेवण्यात येते.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक २०/०९/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**